नि.दि.दावा क्र.१३/२०१९

रामकृष्ण तारापुर –वि.– सविताबाई पल्हाडे

नि.क्र.५० लगत

**वादीचे साक्षीदार क्र. १ चा उर्वरित उलटतपास प्रतिवादीचे वकील श्री. जी. डी. ठाकरे यांचेमार्फत शपथेवर सुरु–**

१३. निशाणी क्र. ५३ वरील खरेदी खताच्या अनुषंगाने जो फेरफार घेण्यात आला होता त्या फेरफारचा क्रमांक मला सांगता येणार नाही. निशाणी क्र. ५३ वरील खरेदीखताच्या अनुषंगाने झालेला फेरफार मी अभिलेखावर दाखल केला आहे. आता मला अभिलेख दाखविला असता त्यावर निशाणी क्र. ५३ च्या अनुषंगाने केलेला फेरफार दाखल नाही. निशाणी क्र. ५३ वरील खरेदीखत करतांना मी उपविभागीय अधिकारी यांची परवानगी घेतली नव्हती. तुकडाबंदी कायद्याच्याअन्वये १५ गुंठे जमिनीची खरेदीखत होण्यासाठी उपविभागीय अधिकारी यांची परवानगी लागत होती की काय याबद्दल मला माहित नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, उपविभागीय अधिकारी यांची परवानगी न घेतल्यामुळे महसुल विभागामार्फत १५ गुंठे जमिनीचा फेरफार रुजु करण्यात आला नव्हता. फेरफार पत्रकातील इतर अधिकारामध्ये १५ गुंठे जमिन तुकडाबंदी कायद्याच्या अंतर्गत येत असल्यामुळे फेरफार रुजु करुन घेता येत नाही असे नमुद केले आहे की काय हे मला माहित नाही. फेरफार पत्रकातील शेऱ्यामध्ये तुकडाबंदी कायद्याच्या अंतर्गत येत असल्यामुळे कागदपत्राची पुर्तता केल्यानंतर पुढे ठेवा असे नमुद केले आहे की काय हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कागदपत्राची पुर्तता न केल्यामुळे फेरफार रुजु झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, संबंधीत मंडळ अधिकारी व तलाठी यांना हाताशी धरुन फेरफार घेण्याचा अधिकार नसतांना सुध्दा मी माझ्या नावाची नोंद महसुल दस्तरी ७/१२ मध्ये करुन घेतली. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीसंदर्भात आजही माझ्याकडे उपविभागीय अधिकारी यांची परवानगी नाही.

१४. हे म्हणणे खरे आहे की, माझा मुलगा धिरज तारापुरे यांच्या विरोधात खामगाव न्यायालयात सरकारी नकली दस्त बनविले व नकली नोटा छापणे याबाबत फौजदारी केस प्रलंबीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ५३ वरील खरेदीखताच्या वेळेस खरेदी करुन देणाऱ्यांनी खरेदीखतामधील जमीन मोजणी करुन माझ्या ताब्यात दिली नाही. निशाणी क्र. ५३ वरील खरेदीखत करुन दिल्यानंतर खरेदी करुन देणाऱ्यांनी महसुल दस्तरी संबंधीत जमिनीचा फेरफार करुन देण्याची परवानगी दिली नसेल. हे म्हणणे खरे नाही की, खरेदी करुन देणाऱ्याची परवानगी नसल्यामुळे खरेदीखत झाल्याच्या एक वर्षानंतर खरेदीखत करुन देणाऱ्याच्या अनुपस्थीत मी महसुल कार्यालयात फेरफारची नोंद करुन घेतली.

१५. दिनांक ०९.०९.२०१२ रोजी मी दावा मिळकत मोजणीसाठी अर्ज दिला होता.

हे म्हणणे खरे आहे की, त्या मोजणीनुसार माझा ताबा ७९८/३/अ या जमिनीऐवजी ७९८/३ या जमिनीवर आढळून आला. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझ्या हद्दीच्या खुणा कायम करुन देण्यात आल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे आहे की, तसा शेरा सुध्दा त्यावेळेसच्या मोजणी शीटवर लिहिण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्या मोणजीनुसार प्रतिवादी क्र. १ चे ५ आर क्षेत्र गट क्र. ७९८/३/अ मध्ये दर्शविण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, तशी नोंद सुध्दा त्यावेळी मोजणी शीटच्या प्रतवर घेण्यात आलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मोजणी शीटची 'ब' प्रत मी अभिलेखावर दाखल केली आहे. आता साक्षीदाराला अभिलेखावरील ब प्रत ची मोजणीशीट दाखविली असता वादीच्या विधीज्ञांनी आक्षेप घेतला की, सदरची मोजणी शीट साक्षीदाराला दाखविता येणार नाही कारण की ती मोजणीशीट साक्ष्जीदाराने तयार केली नाही. वादीच्या विधीज्ञांनी पुढे असे सांगितले की, सदरची मोजणीशीट मुळ प्रत नसुन त्याची दुय्यम प्रत आहे. त्यामुळे मोजणी शीट साक्षीदाराला दाखविता येणार नाही. प्रतिवादीच्या विधीज्ञांनी प्रतिवाद केला की, मोजणीच्या वेळेस साक्षीदार त्याठिकाणी हजर होते व त्या मोजणीसाठी ते स्वतःच अर्जदार आहेत तसेच मोजणीसाठी साक्षीदाराने स्वतःच अर्ज केला होता व त्यांनी मोजणी शीट अभिलेखावर दाखल केलेली आहे. अभिलेखावरील मोजणीशीट साक्षीदारानेच दाखल केल्यामुळे व ती दावा मिळकतीच्या संबंधी मोजणीशीट असल्यामुळे वादीच्या विधीज्ञांच्या आक्षेप फेटाळण्यात येवून मोजणीशीट उलटतपासात दाखविण्याची परवानगी प्रतिवादीच्या विधीज्ञांना देण्यात येते.

१६. आता मला मोजणी शीट दाखविण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, मोजणीशीटवर रामकृष्ण रामलाल तारापुरे यांनी दिलेल्या अर्जावरुन मोजणीचे काम केल्याचे नमुद आहे व त्यावर दिनांक ०९.०९.२०१२ ची तारीख नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यावर उपविभागीय अधिकारी यांचा गोल सिल आहे व ती ब प्रत वरुन नक्कल केल्याचे नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, मोजणीशीटवर अर्जदार यांचा ७/१२ हा ७९८/३/अ चा असुन अर्जदाराची प्रत्यक्ष वाहीवाट ७९८/३ वर आढळून आल्याचे नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, तफावत असल्यामुळे हद्दीच्या खुणा समजून दिल्या नाहीत असे नमुद आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, मी दाखल केलेली ब प्रत खोटी आहे. हे म्हणणे खरे आहे की, ब प्रतवर सविताबाई पल्हाडे यांचे ५ आर क्षेत्र दर्शविलेले आहे.

१७. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी मला खरेदीखताद्वारे दावा मिळकतीचा कधीही ताबा दिला नव्हता. गट क्र. ७९८/३/अ चे क्षेत्रफळ पेरेपत्रकानुसार सन १९७३–७४ ते १९९७–९८ पर्यंत २० आर आहे की काय हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, मुळ हक्क नोंदणी पत्रकानुसार गट क्र. ७९८/३/अ चे क्षेत्रफळ २० आर आहे. एकत्रीकरणाच्या पुढील नोंदनुसार गट क्र. ७९८/३/अ ची नोंद २० आर ऐवजी १५ आर झाली आहे की काय

हे मला माहित नाही. सातबाऱ्यानुसार १.३० प्रमाणे २० आर चीच आकारणी केली आहे की काय हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, मुळ अभिलेखाप्रमाणे गट क्र. ७९८/३/अ चे क्षेत्रफळ दुरुस्त होण्याकरीता मी सुध्दा प्रयत्न केले. हे म्हणणे खरे नाही की, मुळ क्षेत्र दुरुस्त झाल्यानंतर मी प्रतिवादींना खरेदीखत पलटून देणार होतो. हे म्हणणे खरे आहे की, सातबारा माझ्या नावावर असल्यामुळे प्रतिवादींना क्षेत्र दुरुस्त करण्याकरीता अर्ज करता येत नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी क्षेत्र दुरुस्त करण्याकरीता मला विनंती करुन सुध्दा मी कोणताही अर्ज केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, त्या संदर्भात प्रतिवादींनी मला नोटीस सुध्दा दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ७९८/३/अ वर प्रतिवादींचा आज ५ आर क्षेत्रावर ताबा आहे.

१८. शेती दाखवायला मी कोणत्याही व्यक्तीला नेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ७९८/३/अ मध्ये १५ आर वर खरेदीखत करुन देणार दिंडोकार यांचा ताबा आहे व ५ आर वर प्रतिवादींचा ताबा आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीचा ५ आर क्षेत्रावर असलेला ताबा काढून घेण्यासाठी मी त्याच्याविरुध्द पोलीस स्टेशनला तक्रार दिली आहे.

**मध्यान्हाची वेळ झाल्यामुळे साक्षीदाराचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येतो.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्वीकृत | माझे समक्ष |
| स्वा/- | स्वा/- |
| (एन. डी. मेश्राम ) | (एन. डी. मेश्राम ) |
| दि.न्या.क.स्तर, शेगांव कोर्ट क्र.१ ले, | दि.न्या.क.स्तर,शेगांव कोर्ट क्र.१ ले, |
| दि.१५.०२.२०२५ | दि.१५.०२.२०२५ |